नि. फौजदारी खटला क्र. **२४४/२०२३**
सरकार विरूद्ध निखील व अन्य एक
**निशाणी २४**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ५ ची जबानी**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

| | |
|---|---|
| माझे नाव | : पुष्पा सुभाष गौर, |
| वय | : ४० वर्षे, |
| धंदा | : गृहिणी, |
| राहणार | : टाकपुरा, अकोट, ता. अकोट, जि. अकोला. |

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

सुभाष गौर हे माझे पती आहे. घटना अंदाजे अडीच वर्षांपुर्वी घडली. घटना रात्री ११:०५ वाजता घडली. घटना टाकपुरा येथे गणपती मंदिराजवळ घडली. रात्रीचे जेवण आटोपुन मी तसेच काजल व वैष्णवी असे आम्ही शतपावली करण्यासाठी गेलो होतो. आरोपी क्र. १ व २ यांनी आम्हाला पाहुन हसी—मजाक व छेडछाड केली. त्यामुळे काजल ही आरोपी क्र. १ जवळ गेली व आमच्या मोहल्ल्यात येउन आमची छेडछाड का करतो असे विचारले. त्यावर आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. २ ला रॉड काढण्यास सांगितले. त्यामुळे मी माझे पती सुभाष यांना फोन करून बोलवले. माझे पती तेथे आले असता आरोपी क्र. १ व २ यांनी रॉडने माझे पती सुभाष यांना डोक्यावर मारले. त्यामुळे माझे पती सुभाष यांना रक्ताची दुखापत झाली व ते रक्तबंबाळ झाले. आरोपींनी काजल व वैष्णवी यांना हाताने मारले व लोटालाटी केली. आरोपीने त्याच्या घरच्या लोकांनी फोन करून बोलवले व त्यांनी देखील आमच्याशी भांडण केले. पोलीसांनी मला विचारपुस करून घटनेबाबत माझे बयान नोंदवले होते. मी आरोपींना ओळखते. दोन्ही आरोपी आज न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहेत. ज्या रॉडने माझे पतीला मारहाण झाली तो मला दाखवल्यास मी ओळखु शकते. आता मला मुद्देमाल वस्तु क्र. अ वरील एक लोखंडी रॉड दाखवण्यात आला. याच रॉडने माझे पतीला आरोपींनी मारहाण केली होती. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲड. श्री. एस. जी. कुळकर्णी यांचे मार्फत.**

२. पोलीसांनी माझे बयान नोंदवले होते. पोलीसांनी माझे बयान घटनेनंतर ४—५ दिवसांनी नोंदवले. पोलीसांना बयान देतांना आरोपी क्र. १ व

२ यांनी आम्हाला पाहुन हसी—मजाक व छेडछाड केली असे मी सांगितले होते परंतु सदर बाब माझे जबाबात नमुद नाही.

३. पोलीसांना बयान देतांना त्यावर आरोपी क्र. १ याने आरोपी क्र. २ ला रॉड काढण्यास सांगितले असे मी सांगितले होते परंतु सदर बाब माझे जबाबात नमुद नाही.

४. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील रस्त्यावर येणा—या जाणा—या लोकांची राहदारी असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळवरील रस्त्याच्या आजु—बाजुला लोकांची घरे आहेत.

५. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ व फिर्यादी काजल यांचे आपसांत पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी दोन ते अडीच वर्षांपासुन आमच्याकडे माहेरी राहते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला आरोपी क्र. १ पासुन फारकत हवी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ याचे जवळ मालवाहु बोलेरो पिकअप गाडी आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ फिर्यादीला फारकत देत नाही याकारणावरून आरोपींसोबत वाद केला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही दगड व काठ्या मारून आरोपी क्र. १ ची गाडी फोडली व त्याचे खुप मोठे नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गाडीची तोडफोड करतांना माझे पती गाडीच्या बंपर रॉडवर पडले व त्यामुळे त्यांना डोक्याला दुखापत झाली.

६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझे पतीला रॉडने मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी काजल व वैष्णवीला देखील मारले व लोटलाट केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची गाडीची तोडफोड केल्यामुळे आरोपी आपल्याविरूध्द केस करेल अशी आम्हाला भिती असल्यामुळे आम्ही आरोपीविरूध्द प्रस्तुतच खोटा रिपोर्ट दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. **उलटतपास पुर्ण.**

**फेरतपासणी** — काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १०.१०.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.